कार्यालय जिल्हाधिकारी, चंद्रपूर
शाखा ........
आवक 14 JUN 2017 नोंदी क्र. ........
दिनांक
अति. जिल्हाधिकारी जिल्हाधिकारी
नि. उ. जी.
अधिक्षक

3063
15/6/2017

दुरध्वनी क्रमांक
Email Address :- chandrapur1.ee@mahapwd.com

जा.क्र. :: २८२६/ आस्था/का-१(१)/ पुरहानी नि.क./२०१७

दिनांक : ..9.|6.|.2017

# :: कार्यालयीन आदेश ::

विषय :: मान्सुन २०१७ मध्ये संभावित नैसर्गिक आपत्ती व पुरहानी नियंत्रणाकरीता पुरनियंत्रण कक्ष स्थापने बाबत.

सन २०१७ मध्ये नैसर्गिक आपत्ती व अतिवृष्टीमुळे निर्माण होणा-या पुरहाणीच्या नियंत्रणाकरीता आवश्यक उपाययोजना म्हणून सार्वजनिक बांधकाम विभाग क्रमांक १, चंद्रपूर कार्यालयात आपदा प्रतिबंधक आराखडा अंतर्गत पुरनियंत्रण कक्षाची निर्मिती करण्यात आली आहे. पुरनियंत्रण कक्षात काम करण्यास या आदेशाद्वारे सोबतच्या विवरणपत्रानुसार नमुद अधिकारी / कर्मचारी यांची नियुक्ती करण्यात येत आहे. नियुक्त अधिकारी/कर्मचारी यांनी पुरनियंत्रण कक्षात सोबत जोडलेल्या विवरणपत्रात नियुक्ती केलेल्या दिवशी व वेळेत कार्यरत राहावे.

नियुक्त अधिकारी/कर्मचारी यांनी नियंत्रण कक्षात असलेल्या पुरनियंत्रण नोंदवही २०१७ मध्ये आपण उपस्थित झाल्याबाबत स्वाक्षरी करावी तसेच या विभागाअंतर्गत सर्व उपविभागाकडून दर एक तासाने दुरध्वनी वरून माहिती संकलीत करून नोंदवहीत विहीत नमुन्यात नोंदवावी.

तसेच पुरहानी संबंधीत प्राप्त होणारे संदेश व संकलीत माहिती ही सार्वजनिक बांधकाम विभागासाठी नियुक्त खालील प्रमाणे समन्वय अधिकारी यांना दुरध्वनीवरून कळवावी.

| अधिकारी यांचे नांव | पदनाम | दुरध्वनी क्रमांक | |
|---|---|---|---|
| | | कार्यालय/निवास | भ्रमणध्वनी क्रमांक. |
| १. श्री.पी. व्ही. हंद्राळे | उपकार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग क्रमांक २, चंद्रपूर. | २५२२५६<br>२५०१४६ | |

तसेच या आदेशाद्वारे नियुक्त अधिकारी/कर्मचारी यांनी पुरस्थिती संबंधीची महत्वाची माहिती वेळोवेळी खालील अधिका-यांना त्वरीत कळवावी.

| अधिकारी यांचे नांव | पदनाम | दुरध्वनी क्रमांक | |
|---|---|---|---|
| | | कार्यालय/निवास | भ्रमणध्वनी क्रमांक. |
| १. श्री यु. डब्ल्यु. भोयर | कार्यकारी अभियंता (अतिरिक्त कार्यभार) | २५०२४५ | ८८८८८७०३२५ |
| २. श्री एम. बी. टांगले | उपकार्यकारी अभियंता (अतिरिक्त कार्यभार) | २५०२४५ | ९९२३००४१८८ |
| ३. श्री यु.डब्ल्यु.भोयर | उपविभागीय अभियंता, सा.बां.उपविभाग क्र.१, | | ८८८८८७०३२५ |

वरील अधिकारी शासकीय कामानिमित्य मुख्यालयाबाहेर असल्यास सदर पुरहाणी बाबत माहिती खालील अधिकारी यांना कळवावी.

| अधिकारी यांचे नांव | पदनाम | दुरध्वनी क्रमांक | |
|---|---|---|---|
| | | कार्यालय/निवास | भ्रमणध्वनी क्रमांक. |
| १. श्री वाय. एन. घोडमारे | शाखा अभियंता | २५०२४५ | ९६३०४४५९६३ |
| २. श्री. एम. ए. रहीम | आरेखक | २५०२४५ | ८००७८५५२४२ |

तसेच नियुक्ती अधिकारी/कर्मचारी यांनी कार्यालयीन वेळात संकलीत केलेली माहिती ई-मेल द्वारे संबंधितांना सादर करण्यास उपरोक्त प्रमाणे श्री वाय. एन. घोडमारे, शाखा अभियंता यांना कळवावी.

नियुक्ती अधिकारी/कर्मचारी यांनी नमुन दिलेल्या कामात हयगय होणार नाही याची संबंधित अधिकारी/कर्मचारी यांनी स्वतः नोंद घ्यावी. सदर आदेशाचे उल्लंघन तथा कर्तव्यात कसुर करणा-या अधिकारी/कर्मचारी यांचे विरूध्द आपदा प्रबंधक कायद्याअंतर्गत कार्यवाही करण्यात येईल, यात फौजदारी कार्यवाहीचा देखील समावेश आहे, याची सर्वांनी नोंद घ्यावी. सदर आदेशानुसार नियुक्तीप्रमाणे शासकीय सुट्टीतही काम करावयाचे आहे. या कामापासुन कोणालाही सुट मिळणार नाही व नेमुण दिलेलया दिवशी व वेळेत पुरनियंत्रण कक्षात उपस्थित राहुन आपले काम जबाबदारीने पार पाडावेत. पुर्वपरवानगी शिवाय गैरहजर राहिल्यास व कर्तव्य पारायणता न ठेवल्यास संबंधित नियुक्ती अधिकारी/कर्मचारी शिस्त भंगाच्या कार्यवाहीस पात्र राहील याची नोंद घ्यावी. शासकीय सुट्टीच्या दिवशीही काम करावयाचे आहे. अशा शासकीय सुट्टीच्या दिवशी काम करणा-या कर्मचा-यांना त्यांनी मागणी केल्यावर अन्य दिवशी बदली रजा समजुन रजा मंजूर करून घेऊन / पुर्व परवानगीने कार्यालयात उपस्थित राहण्यापासुन सुट देता येईल.

सदर आदेश दिनांक ०७-०६-२०१७ ते ३०-०९-२०१७ पर्यंत अंमलात राहील.

सहपत्र :: विवरणपत्र

कार्यकारी अभियंता,
सार्वजनिक बांधकाम विभाग क्र. १,
चंद्रपूर.

**प्रतिलिपी :-**

१. मा.जिल्हाधिकारी, चंद्रपूर यांना माहितीस सविनय सादर.
२. अधिक्षक अभियंता, सार्वजनिक बांधकाम मंडळ, चंद्रपूर यांना माहितीस सविनय सादर.
३. पोलीस अधिक्षक, चंद्रपूर यांना माहितीस सविनय सादर.
४. कार्यकारी अभियंता, सा.बां.विभाग क्र.२, चंद्रपूर / मा.प्र.विभाग, चंद्रपूर/ रोहयो (सा.बां.) विभाग, चंद्रपूर / जि.प.(बांधकाम) विभाग, चंद्रपूर / पाटबंधारे विभाग, चंद्रपूर यांना माहिती करीता अग्रेषित.